## नियमित दिवाणी दावा क्र. १४२/२०१२ मध्ये निशाणी क्र. ७१ कडील अर्जावर आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींतर्फे कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जास वादींचे म्हणणे घेतले आहे.

२) प्रस्तुत अर्जाच्या कामी दोन्ही पक्षांतील विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

३) प्रस्तुत प्रकरणामध्ये वादी क्र. १अ गुणवंत यांचा पुढील उलटतपास होणे बाकी आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादींचा पुरावा अद्याप सुरु होण्याचा आहे. या परिस्थितीत माझ्या मते या स्थितीला प्रतिवादींना कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी दिल्यास प्रतिपक्षावर अन्याय होणार नाही. त्यामुळे माझ्या मते कागदपत्र दाखल करण्यास परवानगी मिळण्याची प्रतिवादींची प्रस्तुत अर्जातील विनंती न्यायाच्या दृष्टीने मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

### आदेश

१. कागदपत्र दाखल करण्यास परवानगी मिळण्याची प्रतिवादींची प्रस्तुत अर्जातील विनंती मंजूर करण्यात येते.

२. वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2024.06.25 17:03:02 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांकः– २५/०६/२०२४ २ रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.